# मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
## सायबर गुन्हे कक्ष
३ रा मजला, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), यांचे कार्यालय,
ओत्सवाल हाईट्सचे समोर, कनाकिया रोड, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे
फोन नंबर –०२२-२८११ ०१३५, व्हॉट्सअॅप हेल्पलाईन क्र. ९०० ४८८ ०१३५
**Email ID – cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :-१८८/२०२२ दिनांक :- २२/०६/२०२२

# घरकाम करणा-या महीलेची इलेक्ट्रीसिटी बिलबाबत फसवणूक झालेली रक्कम रुपये २९,९९८/- परत मिळविण्यात सायबर गुन्हे कक्षास यश !!!

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत मिरारोड परिसरात घरकाम करणाऱ्या महीला नामे फराह शेख यांचे मोबाईलवर अदानी इलेक्ट्रीसिटीमधून बोलत असल्याचे भासवून ***तुमचे विजेचे बिल भरणे बाकी आहे ते न भरल्यास विजपुरवठा खंडीत होईल.*** सदर विजपुरवठा अखंडीत चालू ठेवण्याकरीता ओटीपी देण्याकरीता अनोळखी इसमाने सांगितले. सदर महिलेने ओटीपी दिला असता त्यांचे बँक खात्यावरून २९,९९८/- रुपयाची फसवणूक झालेबाबत तक्रारी अर्ज सायबर गुन्हे कक्ष आवक अर्ज क्रमांक ८५८-बी/२०२२ दिनांक २१/०६/२०२२ रोजी चौकशीकामी प्राप्त झाला होता.

नमूद तक्रारीबाबत सायबर गुन्हे कक्षाने तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांचे झाले व्यवहाराबाबत माहिती प्राप्त करण्यात आली. प्राप्त माहितीचे अवलोकन केले असता तक्रारदार यांची फसवणूक रक्कम **ECOM – CAS LUDO NINJA FARIDAB** यावर गेल्याचे निष्पन्न झाले. याबाबत तात्काळ ऑनलाईन गेम कंपनीसोबत पत्रव्यवहार करुन तसेच पाठपूरावा करुन नमूद फसवणूक रक्कम थांबविण्यात आली. तसेच फसवणूक रक्कम **अवघ्या एक तासामध्ये** दिनांक २१/०६/२०२२ रोजी पुन्हा तक्रारदार यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्यात आली.

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **अशा प्रकारे फसवे कॉल अथवा एसएसएस प्राप्त झाल्यास त्यावर कोणताही प्रतिसाद देवू नये.**
- **आपल्या मोबाईल क्रमांकावर प्राप्त होणारे एसएमएस, ईमेल,कॉल्स यांची विश्वासहर्ताची पडताळणी करावी.**
- **आपले मोबाईलवर प्राप्त होणारा OTP किंवा आपली वैयक्तीक माहिती देवू नये.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे कोणत्याही इसमाची फसवणूक झाल्यास अथवा असे कृत्य कोणी इसम करीत असल्याचे आढळुन आल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री.विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर, मपोअं/१६१०६ सुवर्णा माळी, मपोअं/१२००७ माधुरी धिंडे यांनी पार पाडली आहे.

सायबर गुन्हे शाखा संपर्क क्रमांक :- ०२२-२८११ ०१३५
सायबर गुन्हे शाखा व्हॉट्सअॅप हेल्पलाईन क्रमांक :- ९०० ४८८ ०१३५
➢ सायबर गुन्हे शाखा ई-मेल आयडी :- **cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**

**----0000----**